शिका, संघटित व्हा, संघर्ष करा.

# प्रज्ञा

वर्ष दुसरे | अंक अकरावा | जानेवारी 2026

डॉ. आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय येरवडा, पुणे चे वार्तापत्र

अध्यक्ष : श्री. आनंदराज आंबेडकर | उपाध्यक्ष : डॉ. दत्ता देशकर | सचिव : श्री. संजीव बोधनकर | प्राचार्य : डॉ. गौतम बनसोडे | संपादक : प्रा. सचिन गुळीग

संपादक मंडळ : डॉ. अनिल घोलप, प्रा. धीरज गडहिरे | विद्यार्थी प्रतिनिधी : स्नेहल कांबळे, रतन शिंदे

## संपादकीय

### आम्ही CHB प्राध्यापक

शिक्षण ही समाज परिवर्तनाची सर्वात प्रभावी शक्ती मानली जाते. या शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू म्हणजे प्राध्यापक. मात्र आज उच्च शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या CHB (Clock Hour Basis) प्राध्यापकांची अवस्था अत्यंत दुर्दैवी आणि शोकांतिकेसारखी बनली आहे. ज्ञानदानाचे व्रत स्वीकारलेले हे प्राध्यापक आज स्वतःच असुरक्षिततेच्या छायेत जगत आहेत.

CHB प्राध्यापकांना तासिका तत्त्वावर मानधन दिले जाते. नियमित प्राध्यापकांप्रमाणेच अध्यापन, विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन, अंतर्गत मूल्यमापन, परीक्षा व इतर शैक्षणिक जबाबदाऱ्या ते प्रामाणिकपणे पार पाडतात. तरीही त्यांना ना कायमस्वरूपी नियुक्ती, ना वेतनाची खात्री, ना सामाजिक सुरक्षा मिळते. अनेकदा महिनोन्महिने मानधन मिळत नाही, तर सुट्यांच्या काळात उत्पन्न पूर्णपणे बंद होते.

आजच्या सद्यस्थितीत वाढती महागाई, घरभाडे, कुटुंबाचा खर्च, आरोग्य सेवा आणि मुलांचे शिक्षण या मूलभूत गरजा भागवताना CHB प्राध्यापकांची मोठी तारांबळ उडते. उच्च शिक्षण, संशोधन आणि अनुभव असूनही त्यांना आर्थिक स्थैर्य लाभत नाही. या परिस्थितीमुळे मानसिक तणाव, नैराश्य आणि आत्मसन्मानावर होणारे आघात वाढताना दिसत आहेत.

शोकांतिका ही आहे की, जे प्राध्यापक विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये, स्वप्ने आणि भविष्याची दिशा घडवतात, त्यांच्याच आयुष्याला कोणतीही दिशा आणि सुरक्षितता उरलेली नाही. शासन आणि शिक्षण संस्थांकडून त्यांच्याकडे तात्पुरते व स्वस्त पर्याय म्हणून पाहिले जाते. यामुळे शिक्षण व्यवस्थेतील गुणवत्ता, सातत्य आणि विश्वासार्हता यांवरही विपरीत परिणाम होतो.

आजची गरज आहे ती C H B प्राध्यापकांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची. किमान वेतनाची हमी, वेळेवर मानधन, सामाजिक सुरक्षा, अनुभवाच्या आधारे नियमितीकरण आणि सन्मानाची वागणूक देणे अत्यावश्यक आहे. केवळ धोरणात्मक घोषणांपेक्षा ठोस अंमलबजावणी अधिक महत्त्वाची आहे.

जोपर्यंत CHB प्राध्यापकांच्या समस्या गांभीर्याने सोडवल्या जात नाहीत, तोपर्यंत शिक्षण व्यवस्थेचा पाया कमकुवत राहील. तसेच महाविद्यालयातील कायम तत्वावरील मान्यवरांनी CHB च्या समस्या समजून घेतल्या तर दैनंदिन प्रवास सुंदर असेल, अर्थातच शिक्षक सुरक्षित तर शिक्षण सक्षम — ही जाणीव शासन, संस्था आणि समाजाने मनापासून स्वीकारणे हीच काळाची गरज आहे.

संपादक<br>
प्रा. सचिन गुळीग, इतिहास विभाग<br>
9545600535



सालाबादप्रमाणे याही वर्षी सुभेदार रामजी आंबेडकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आज महाविद्यालयात यशस्वीरीत्या संपन्न झाली. सदर स्पर्धेसाठी महाविद्यालयातील व्होकेशनल विभाग, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ विभाग तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहयोगाने ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे समन्वयक प्रा. कैलास शिंदे सह समन्वयक प्रा. गीतांजली हाके. तसेच त्यांची संपूर्ण संयोजन समिती यांनी अतिशय उत्कृष्टपणे नियोजन केले. स्पर्धेसाठी नियोजित केलेल्या सर्व समितीतील सर्व सदस्यांनी खूप मेहनत घेऊन स्पर्धा यशस्वी केली आहे.

वरिष्ठ विभागात प्रथम क्रमांक - अमोल गोळे (निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भोर), द्वितीय क्रमांक - पूर्वा नाकतोडे (अण्णासाहेब मगर महाविद्यालय हडपसर) , तृतीय क्रमांक - रसिका भोसले (डॉ.आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, येरवडा), उत्तेजनार्थ - नितीन गागरेज (संस्कार मंदिर संस्था महाविद्यालय वारजे) तर कनिष्ठ विभागातुन प्रथम क्रमांक - प्राची पवार (श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर), द्वितीय क्रमांक - समर्थ देसाई (साधना महाविद्यालय, हडपसर), तृतीय क्रमांक - कार्तिकी सुरवसे (अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर), उत्तेजनार्थ - पुष्पराज झोल (आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे) यानुसार विद्यार्थ्यांनी पारितोषिक प्राप्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.कैलास शिंदे यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.डॉ. श्रेयसी परब, प्रा.गीतांजली हाके, प्रा.रीमा खरे यांनी केले. आभार प्रा. डॉ. रुपेश थोपटे यांनी मानले.

स्पर्धेचे परीक्षक म्हणुन डॉ. गजानन भोसले, प्रा. प्रज्ञा कुलकर्णी, प्रा. शिवाजी मोटेगावकर यांना कामकाज पाहिले व निकाल जाहीर केला. पीपल्स एज्युकेशन सोसायटी उपाध्यक्ष डॉ. दत्ता देशकर यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक देण्यात आले.



डॉ. आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना कॅम्प 21 ते 27 दरम्यान वर्वे येथे पार पडला. यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.संपत शिंदे, सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. सचिन गुळीग, सदस्य प्रा. वर्षाराणी वाघमारे, प्रा. अविनाश तायडे व इतर प्राध्यापकांच्या मदतीने यशस्वी पार पडला. या प्रसंगी वरवे ग्रामपंचायत



डॉ. आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात 77 वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ. गौतम बनसोडे, डॉ. रुपेश थोपटे व इंग्लिश मिडीयम स्कूल चे सर्व शिक्षक व पदाधिकारी यांनी ध्वजारोहण करून प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.

बा भीमा तुझ्यावर कविता लिहावी म्हणतो,<br>
पण शब्द माझे तितके श्रीमंत नाहीत..<br>
तुझ्या अथांग कर्तृत्वाचा अंत घ्यायला,<br>
माझ्या लेखणीत ते सामर्थ नाही!<br>
मी शब्द कोठून आणू? तूच तर शब्दांना अर्थ दिलास,<br>
गुलामगिरीच्या काळोखात तूच क्रांतीचा सूर्य झालास,<br>
तुझी स्तुती करायला माझी श्रीमंती अपुरी पडेल....<br>
पण माझ्या प्रत्येक श्वासात तुझाच विचार जिवंत राहील!

सागर जगताप<br>
SYBA

# राष्ट्रसंतांना अपेक्षित आजचा युवा !!

'जड़ा डाल डाल पर सोनेकी
चिडिया करती है बसेरा,'

असा वैभवशाली, संपन्न आणि प्रगत देश म्हणून भारताची ओळख आहे. संत, साधू, विचारवंत, समाजसुधारक आणि क्रांतिकारकांची ही भूमी आहे. जगाला दिशा देणाऱ्या साहित्य, तत्त्वज्ञान आणि मानवतावादाचा वारसा भारताने दिला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या असलेला देश म्हणून भारत ओळखला जातो. सुमारे ६५ टक्के युवकसंख्या ही भारताची ताकद आहे—पण ही ताकद आज योग्य दिशेने वापरली जात आहे का, हा खरा प्रश्न आहे.

इतिहासात रमून राहणे नव्हे, तर इतिहासातून शिकून भविष्य घडवणे आवश्यक असते. मात्र आजची युवापिढी या दोन्ही गोष्टींपासून दूर जात असल्याचे चित्र दिसते. ज्या भूमीत संतांनी मानवतेचा मंत्र दिला, जिथे राष्ट्रसंतांनी समाजपरिवर्तनाची मशाल पेटवली, त्याच देशातील युवक आज मूल्यहीनतेच्या गर्तेत अडकताना दिसतो. मग खरोखरच आपण राष्ट्रसंतांचा वारसा जपतो आहोत का, असा प्रश्न निर्माण होतो.

आजचा युवक हा उद्याच्या भारताचा शिल्पकार आहे. पण हा शिल्पकार दिशाहीन, असंवेदनशील आणि आत्ममग्न होत चालला आहे. दुसऱ्याच्या वेदना समजून घेण्याची संवेदना कमी होत आहे. तंबाखू, गुटखा, दारू आणि आभासी प्रतिष्ठा यांनाच जीवनाचे अंतिम ध्येय मानले जात आहे. सोशल मीडियावरची लाईक-कॉमेंट-स्टेटस यामध्ये अडकलेले युवक खरोखर सशक्त विचार करू शकतात का, याचा गंभीर विचार होणे आवश्यक आहे.

तुकाराम महाराज म्हणतात—
"पुत्र व्हावा ऐसा गुंडा, ज्यांचा तिन्ही लोकी झेंडा"
मात्र आजची स्थिती अशी झाली आहे की—
"पुत्र झाला ऐसा गुंडा, ज्याचा फक्त सोशल मीडियावर झेंडा!"

ही स्थिती राष्ट्रासाठी धोक्याची आहे. कारण नेतृत्वहीन, दिशाहीन आणि मूल्यशून्य युवक देशाला प्रगतीकडे नाही, तर अधःपतनाकडे घेऊन जातो.

मात्र युवक चुकीचा आहे असे म्हणणेही अन्यायकारक ठरेल. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव हेही त्यांच्या काळात अनेकांना चुकीचे वाटत होते. युवकाचा जोश चुकीचा नसतो; त्याला योग्य दिशा न मिळाल्यास तो विध्वंसक ठरतो. म्हणूनच आजच्या युवापिढीला राष्ट्रसंतांच्या विचारांची नितांत गरज आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी 'ग्रामगीता'च्या माध्यमातून ग्रामनिर्माणाचे शास्त्र दिले. "गाव स्वयंपूर्ण झाला, तर राष्ट्र स्वयंपूर्ण होईल," हा त्यांचा ठाम विचार होता. कर्मकांडाला फाटा देत त्यांनी विवेक, श्रम, शिक्षण आणि मानवतेचा पुरस्कार केला. संत गाडगेबाबांनी शिक्षण, स्वच्छता आणि समतेचा संदेश दिला. स्वामी विवेकानंदांनी युवकाला जागे केले—"उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका!"

आजच्या युवकाने जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार करायला हवा. व्यसनमुक्त, विवेकशील, उद्योगी आणि देशाभिमानी युवक हीच राष्ट्राची खरी गरज आहे. स्वतःपुरते न जगता समाजासाठी जगणारा, गावागावांतून परिवर्तनाची मशाल पेटवणारा युवक राष्ट्रसंतांना अपेक्षित होता.

प्रभावहीन आणि दिशाहीन तरुणाईला सजग, कर्तव्यदक्ष आणि राष्ट्रनिष्ठ बनवणे ही काळाची गरज आहे. ही लढाई शस्त्रांची नाही, तर विचारांची आहे. आणि या लढाईतील सर्वात प्रभावी अस्त्र म्हणजे राष्ट्रसंतांचे तेजस्वी विचार.

मानवता, राष्ट्रभावना आणि समाजसेवा या मूल्यांवर उभा राहणारा युवक घडला, तर भारताचे राष्ट्रनिर्माणाचे स्वप्न निश्चितच साकार होईल.

आकांक्षा अरुणराव उके
MA-II



# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले: स्त्री शिक्षणाची पहिली पहाट आणि 'बालिका दिन'



भारताच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी होऊन गेली, ज्यांनी स्वतःच्या आयुष्याचा होम करून समाजाला प्रकाशाची वाट दाखवली. त्यातीलच एक तेजस्वी नाव म्हणजे 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले'. ३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिवस. महाराष्ट्र शासनाने हा दिवस 'बालिका दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेऊन त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव केला आहे. आजच्या या ब्लॉगमध्ये आपण सावित्रीबाईंचा संघर्ष आणि त्यांचे आजच्या युगातील महत्त्व जाणून घेणार आहोत.

संघर्षाची ठिणगी आणि शिक्षणाची ज्योत

१८४८ साली पुण्यातल्या भिडे वाड्यात जेव्हा महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाईंनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली, तेव्हा तो केवळ एक शैक्षणिक प्रयोग नव्हता, तर ती प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुद्ध पुकारलेली एक क्रांती होती. त्या काळी स्त्रियांनी शिक्षण घेणे हे पाप समजले जात असे.

सावित्रीबाई जेव्हा खांद्यावर पदर खोचून मुलींना शिकवण्यासाठी शाळेत जायच्या, तेव्हा सनातनी लोक त्यांच्यावर शेण आणि दगड फेकत असत. पण सावित्रीबाई डगमगल्या नाहीत. त्या सोबत एक जास्तीची साडी पिशवीत घेऊन जात आणि शाळेत पोहोचल्यावर शेणाने माखलेली साडी बदलून पुन्हा शिकवायला लागत. "माझ्यावर फेकलेले दगड आणि शेण हे मला फुलासारखेच आहेत, कारण ते मला माझ्या ध्येयाची आठवण करून देतात," असे त्या म्हणत. हा त्यांचा निग्रहच आज कोट्यवधी मुलींच्या आयुष्यात शिक्षणाचा प्रकाश घेऊन आला आहे.

केवळ शिक्षिका नव्हे, तर समाजसुधारिका सावित्रीबाईंची ओळख केवळ 'पहिली महिला शिक्षिका' एवढीच मर्यादित नाही. त्या एक थोर समाजसुधारिका देखील होत्या.


* विधवा विवाह: त्यांनी विधवा विवाहाला प्रोत्साहन दिले.
* बालहत्या प्रतिबंध: विधवा स्त्रियांच्या मुलांसाठी त्यांनी आपल्या घरातच 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरू केले.
* सत्यशोधक समाज: जोतिरावांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे सांभाळली.
* दुष्काळ निवारण: 1897 च्या प्लेगच्या साथीत स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी रुग्णांची सेवा केली आणि त्यातच त्यांना 10 मार्च 1897 रोजी वीरमरण आले.

सावित्रीबाईंसारखे निडर आणि स्वावलंबी बनवू.

"विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली,
नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले,
वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले."

या महात्मा फुलेंच्या ओळींची आठवण ठेवून, ज्ञानाची ही ज्योत अखंड तेवत ठेवणे हीच सावित्रीबाईंना खरी आदरांजली ठरेल!

**प्रा. गीतांजली हाके**
अर्थशास्त्र विभाग



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शीख धर्म चाचपणी



13 व 14 एप्रिल 1936 रोजी हिंदू महासभेचे नेते डॉ. मुंजे यांनी राजगृह (दादर) येथे येऊन त्यांना शीख धर्म स्वीकारण्याची विनंती केली.

बाबासाहेबांनी अमृतसर येथील शीख मिशनरी परिषदेत हजेरी लावली तेंव्हा अध्यक्ष: न्यायाधिश सरदार बहाद्दुर हुकूमसिंग होते. दरम्यान अतिउत्साहात केरळचे दलित नेते डॉ. को. धीर यांनी शीख धर्माचा स्वीकार केला. त्यावेळी बाबासाहेबांनी पुतण्या मुकुंद, चिरंजीव यशवंत व सोबत 13 सदस्यांना अमृतसर येथे गुरुद्वारात वास्तव्य व अभ्यासासाठी पाठवले पैकी 13 सदस्यांनी शीख धर्माचा आंबेडकरांची परवानगी न घेता प्रवेश केला . गुरु नानकांनी संत रविदास यांचा गौरव केला तसेच गुरु गोविंदसिंग यांनी शिख धर्मात अस्पृश्यांनी यावे म्हणून पंच प्यारे, पहिल्या पाच खालसांपैकी तिघे अस्पृश्य घेतले होते. डॉ. बाबासाहेब जेंव्हा 1936 इंग्लंड प्रवासाला गेले तेंव्हा त्यांना 7 हजार रु. मदत केली. 1937 साली नारायणसिंग यांनी मुंबई येथे खालसा कॉलेज सुरु केले प्रसंगी डॉ. आंबेडकर सोबत होते. त्याचवेळी पटियालाचे महाराज यांनी आंबेडकरांना दिवाण पदाची ऑफर दिली मात्र बाबासाहेबांनी नम्रतेने नाकारली. परंतु सरदार किशनसिंग यांनी शिख धर्म स्विकारु नका असे सांगितले त्याचा उल्लेख 4 फेब्रु. 1933 रोजीच्या जनता वृत्तपत्रात आला आहे. 1937 डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बैशाखी पौर्णिमेच्या दिवशी अमृतसर येथे भाषण दिले. मात्र काही कारणास्तव बाबासाहेबांनी सिख धर्म स्वीकारला नाही.

**स्नेहल कांबळे**
TYBA

# गोष्ट पाण्याची - भाग 9

**वाचा आणि विचार करा :**

(१) देशाची लोकसंख्या वाढत आहे. पण निसर्गाने दिलेला पाणी पुरवठा मात्र तेवढाच राहणार आहे. यामुळे प्रत्येकाच्या वाटेला येणारे पाणी उत्तरोत्तर कमी होणार आहे. म्हणून पाणी काळजीपूर्वक वापरणे गरजेचे आहे.

(२) सांडपाणी चांगल्या पाण्याला सुद्धा अशुद्ध करु शकते. म्हणून सांडपाणी नद्या व तलावांपर्यंत जाता कामा नये. सांडपाणी पहिले शुद्ध करा आणि मगच त्याला नदी तलावाकडे जावू द्या.

(३) तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सांडपाणी इतके शुद्ध केले जावू शकते की ते पिण्यासाठी सुद्धा वापरले जावू शकते. नवीन तंत्रज्ञान वापरुन सिंगापूर सारख्या देशात पाण्याची ४० टक्के गरज अशा प्रकारे भागवली जात आहे.

(४) समुद्राचे खारे पाणी अमाप आहे. त्यात खारेपणा असतो. यंत्राच्या सहाय्याने तो कमी केला जावू शकतो. तो अलग केला तर तेही पाणी पिण्यासाठी वापरले जावू शकते. या क्रियेला निर्भवलीकरण म्हणतात. असे पाणी सिंगापूर, इस्त्राइल आणि इतर अरब देशात वापरले जाते. आपल्या देशातही चेन्नईला असेच पाणी वापरले जाते

(५) इंग्रजीमधे One run saved is one run gained अशी एक म्हण आहे. आपल्या दृष्टीने या म्हणीचा अर्थ असा लावला जावू शकतो की पाण्याचा एक थेंब वाचला तर पाणी एका थेंबाने वाढले. प्रत्येकाने एक लिटर पाणी वाचवले तर देशात १४० कोटी लिटर पाणी वाचू शकेल.

(६) तेच ते पाणी अनेकदा वापरले जावू शकते. सिंगापूर आणि इस्त्राइलमधे एकदा वापरले गेलेले पाणी पुन्हा पुन्हा आठदा वापरले जाते. म्हणजेच देशातील पाणी पुरवठा आठदा वाढला असे म्हंटले जावू शकते.

(७) शुद्ध पाणी ज्याचे घरी, तिथे आरोग्य वास करी असे म्हणतात. त्यामुळे पाणी ग्रहण करतांना ते शुद्ध आहे हे तपासूनच वापरले जावे. माणसाला जे विकार होतात त्यापैकी ८० टक्के विकार अशुद्ध पाणी पिल्यामुळे होतात असे वैद्यक शास्त्र म्हणते. त्यामुळे पिण्याचे पाणी शुद्ध आहे याची खात्री करुन मगच सेवन करा.

(८) पाणी भरपूर आहे, ते कसेही वापरले जावू शकते या भ्रामक समजूतीतून बाहेर या. पाणी भरपूर आहे हो. पण जे माणसाने वापरायचे गोडे पाणी आहे मात्र मर्यादित आहे ही गोष्ट लक्षातच असू द्या. एकूण पाण्याच्या फक्त २.५ टक्के पाणी माणसाच्या वापरासाठी आहे.

(९) देशात भरपूर नद्या असून सुद्धा प्रत्येक गावाला वा शाहराला त्यांचा लाभ मिळेलच असे नाही. ज्या गावाजवळ नद्या आहेत अशा गावात राहणाऱ्या लोकांना नशीबवान म्हणायला हवे. नदी आपल्या नशीबात नसेल तर पाणी मिळणे आपल्याला कठीण जाणार हे लक्षात ठेवा.

(१०) Catch the rain where it falls अशा अर्थाची इंग्रजी मधे एक म्हण आहे.. जिथे पाऊस पडतो तिथेच त्याला अडवले वा जिरवले तर आपली पाण्याची गरज चांगल्या प्रकारे भागवली जावू शकते.

(११) आपण काय करतो, बघा. पावसाच्या थेंबाला वाहून जावू देतो. तोच नाल्यात जातो. तिथून तो नदीला जावून मिळतो. नदीवर आपण धरणे बांधतो आणि जो पाण्याचा थेंब वाहून जावू दिला त्यालाच परत आपण आपल्या शेतावर घेवून येतो. हे कितपत शहाणपणाचे आहे याचा विचार करा.

(१२) पाणी हे विकासाचे साधन आहे. देशातील शेती, व्यापार, उद्योग, वाहतूक, वीज निर्मिती या सर्व गोष्टी पाण्यावरच अवलंबून असतात. जो देश पाण्याचा योग्य वापर करतो तोच विकसित होतो हे लक्षात असू द्या. सिंगापूर आणि इस्त्राइल ही या संबंधात उदाहरणे दिली जातात. इथे पाण्याचा काटेकोरपणे वापर केला जातो.

(१३) वृक्ष पाणी जमिनीत पाणी मुरवण्याचे काम करतात. जमिनीतील कठी णातील कठीण ख़डक सुद्धा झाडांची मूळे फोडतात. त्यात फटी निर्माण करतात. तिथून पाणी भूगर्भात प्रवेश करते यालाच आपण भूजल म्हणतो. म्हणून जमिनीत पाणी जाण्यासाठी मदत करणारे वृक्ष जास्त प्रमाणात लावा. वनमहोत्सवात सहभागी व्हा. झाडे जगवा, भूजल समृद्ध करा.

(१४) माणसाचे शरीर पाण्यापासूनच बनले आहे. प्रत्येक माणसाच्या शरीरात जे विविध अवयव असतात त्यात ७० टे ८० टक्के पाणीच असते. नियमित पाणी सेवन न केल्यास थकवा येतो. तेच चालू ठेवल्यास ग्लानी येते. आणि नंतर मृत्यूला सामोरे जावे लागते.

(१५) शरीर कार्यक्षम ठेवायचे असल्यास ठराविक अंतराने जल सेवन करणे आवश्यक आहे. दररोज कमीत कमी दीड ते दोन लिटरल पाणी पिलेच पाहिजे. शरीरातील पाणी कमी झाले हे ओळखण्याचे आपल्याजवळ एक साधन आहे. आपल्या लध्वीचा रंग गडद पिवळा झाला म्हणजे शरीराला पाण्याची गरज आहे हे ओळखा. उभे राहून पाणी पिण्यापेक्षा खाली बसून पाणी प्यावे. स्वास्थ्यासाठी ते चांगले असते.

(१६) रस्ते, रेल्वे आणि जल वाहतूक यांची तुलना केली तर रस्ते वाहतूक सर्वात महाग, रेल्वे वाहतूक त्यापेक्षा स्वस्त आणि जल वाहतूक सर्वात स्वस्त असे दिसून येते. परदेशी वाहतूक सहसा जल वाहतूक असते. देशातील नद्याही जलवाहतूकीला मदत करत असतात.

(१७) पाणी आपल्यासमोर वेगवेगळ्या स्वरुपात असते. कधी ते पाण्याच्या स्वरुपात, कधी ते बर्फाच्या स्वरुपात, कधी ते वाफेच्या स्वरुपात, कधी ते दवाच्या स्वरुपात, कधी ते दलदलीच्या स्वरुपात तर कधी ते हवेतील दमटपणाचे स्वरुपात उपलब्ध असते. पाण्याच्या वाफेत अगाध शक्ती असते. त्या वाफेच्या मदतीने रेल्वे गाड्याही चालू शकतात.

(१८) पाण्यापासून वीजसुद्धा निर्माण केली जाते. टराबाइनवर वेगाने पाणी सोडले तर त्याचे पंखे फिरतात. त्यामुळे टरबाइनला गती येते व वीज निर्मिती होते. वीज कोळशापासून, अणूंपासून, पाण्यापासून, हवेपासून वा सूर्याच्या उष्णतेपासूनही निर्माण केली जाते. सूर्यशक्ती नंतर स्वस्त असण्यात जल शक्तीचा नंबर लागतो.

**डॉ. दत्ता देशकर**
**उपाध्यक्ष, PES**

---

# NSS कॅम्प बद्दल प्रतिक्रिया




कॉलेजचा NSS कॅम्प हा खूपच उपयुक्त आणि प्रेरणादायी अनुभव ठरला. या कॅम्पमुळे शिस्त, संघभावना आणि समाजसेवेचे महत्त्व समजले. स्वच्छता मोहिम, वृक्षारोपण, जनजागृती उपक्रम यामुळे सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाली. स्वयंसेवक आणि प्राध्यापकांचे मार्गदर्शन उत्कृष्ट होते. हा कॅम्प आमच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत फायदेशीर ठरला.

**विघ्नेश वेताळ** (S.Y.B.Com)

----------------------------------------------------------------

NSSकॅम्पमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण वाढीस लागले. विविध उपक्रमांमधून टीमवर्क, वेळेचे नियोजन आणि समाजाशी संवाद साधण्याची कला शिकायला मिळाली. ग्रामीण भागातील अनुभव खूपच शिकवण देणारा होता. हा कॅम्प केवळ उपक्रम न राहता आयुष्याला दिशा देणारा अनुभव ठरला.

**सोहेल** (S.Y.B.Com)

----------------------------------------------------------------

कॉलेज N S S कॅम्प हा संस्मरणीय अनुभव होता. समाजासाठी काहीतरी करण्याची संधी या कॅम्पमुळे मिळाली. श्रमदान, स्वच्छता अभियान, आरोग्य व शिक्षणाबाबत जनजागृती यामुळे सामाजिक बांधिलकी अधिक घट्ट झाली. मित्रमैत्रिणींसोबत मिळून काम करताना एकोप्याची भावना निर्माण झाली. हा कॅम्प खूप सकारात्मक ऊर्जा देणारा होता.

**रितेश** (S.Y.B.Com)

# Traditional Day Celebration





डॉ. आंबेडकर महाविद्यालयात मानसिक आरोग्य (टास्क फोर्स) या विषयावर कार्यशाळा पार पडली. मार्गदर्शन करतानाचे क्षणचित्र.



दिनांक 30 जानेवारी रोजी महात्मा गांधीजींच्या स्मरणार्थ विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी महाविद्यालयात मौन बाळगून आदरांजली अर्पण केली.



दिनांक 8 जानेवारी रोजी डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे एक दिवसीय शिष्यवृत्ती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचे महत्त्व पटवून दिले..महाविद्यालयातील शिष्यवृत्ती विभागाचे प्रभारी कार्यालयीन लिपिक श्री. सुरज कांबळे यांनी विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती दिली.



पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. आनंदराज आंबेडकर साहेब यांनी आज दि. १०/१/२०२६ रोजी महाविद्यालयास सदिच्छा भेट देऊन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.

## डॉ. आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना (NSS Camp) वर्वे येथे 21 ते 27 जानेवारी दरम्यान पार यशस्वी पडला.



डॉ. आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना कॅम्प 21 ते 27 दरम्यान वर्वे येथे पार पडला दरम्यान विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून सचिन पवार सरांची कॅम्प ला भेट.



